क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/४०६/०१५
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- १८.०२.२०१५

**प्रति,**

**सन्मा. श्री / श्रीमती ------------------------------------------**

**सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ**

**मुक्काम ----------------------- पोष्ट --------------------**

**तालुका ----------------------- जिल्हा: यवतमाळ.**

**मार्फत :-** **गट विकास अधिकारी, पंचायत समिती -------------------------**

दिनांक ३१.०१.२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा अहवाल आपले माहिती करिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**स्थायी समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. ------------------------------------------------------ ------------------------------------------- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. --------------------------------------- खासदार / आमदार. मुक्काम -------------------- पोष्ट -------------- तालुका -------------------- जिल्हा-------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, / मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ----------------------------------------- जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. आपले विभागाशी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मा.अध्यक्ष, व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच अनुपालन अहवालाच्या २५ प्रती (विहीत प्रपत्रात) तात्काळ सा.प्र.वि.च्या परिषद विभागाकडे सादर कराव्या.

६] गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----------------- (सर्व)

## जि.प.स्थायी समिती सभा दिनांक ३१.०१.२०१५

दिनांक ३१.०१.२०१५ रोजी दुपारी १-०० वाजता स्थायी समितीचे सभागृहात मा. अध्यक्ष, जि. प. यवतमाळ तथा सभापती (स्थायी समिती) यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा घेण्यात आली. सभेला जि. प.चे खालील मा. पदाधिकारी, सन्मा. स्थायी समिती सदस्य, खाते प्रमुख, व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा.सौ. आरतीताई ह. फुपाटे | सभापती,(स्थायी समिती) तथाअध्यक्ष,जि.प.यवतमाळ | मा.श्री.अनिल शं. मांगुळकर | उपाध्यक्ष, जि.प. यवतमाळ |
| मा. श्री. नरेंद्र के. ठाकरे | सभापती (शि. व आ. स.) | मा.श्री. सुभाष म. ठोकळ | सभापती (बांध व अर्थ स.) |
| मा. सौ. लताबाई पां.खांदवे | सभापती (स.क.स.) | मा. सौ.विमलबाई र. चव्हाण | सभापती (म.व.बा.क.) |
| सन्मा. श्री. प्रविण वि. देशमुख | सदस्य | सन्मा. श्री.राहुल मा. ठाकरे | सदस्य |
| सन्मा.श्री. देवानंद न. पवार | सदस्य | सन्मा. श्री.अनिल भ. नरवाडे | सदस्य |
| सन्मा. श्री.अमन ह. गावंडे | सदस्य | - | - |
| - | - | सन्मा.श्री. दिवाकर ध. राठोड | सदस्य |
| **मा. आमंत्रीत अधिकारी (सर्वश्री)** | | | |
| डॉ.मल्लीनाथ कलशेट्टी | मुख्य कार्यकारी अधिकारी | अरुण मोहोड | उप मु. का.अ. (सा.) |
| डॉ. शरद कुलकर्णी | अति. मु.का.अ. | व्ही.के.मरसाळे | उप मु.का.अ.(बा.क.) |
| ए.एम.नितनवरे | का.अ.बांध क्र.२ | विजय देशमुख | (प्र.) मु.ले.व वि.अ. |
| एम.एस.तपासे | का.अ.बांध. क्र.१ | सौ. सुचिता पाटेकर | शि.अ.(प्राथ.) |
| डी.जे. पाली (प्रतिनिधी) | कार्य.अभि.(सिंचन) | के.टि. उमाळकर | कार्य अभि. (पा.पु.) |
| डॉ. के.झेड. राठोड | जि.आ.अ. | डॉ. दिलीप सोनकुसरे | जि.पशु संवर्धन अधि. |
| सी.जी.वंजारी | उप.शि.अ.(माध्य.) | डॉ. वाल्मीक इंगोले | उप शि.अ.(सशिअ) |
| जे.आर. राठोड | कृषि विकास अधिकारी | श्रीमती जया वि. राऊत | समाज कल्याण अधिकारी |
| डब्ल्यु.यु.नगराळे | का.अ.म.वि.वि.कं.पुसद | एस के. राठोड | उप अभि. म.वि.वि.कं. यवतमाळ |
| संजय वानखडे | कृ.अ.नरेगा | डी.पी. चौधरी | उप अभि.(यां.)भु.स.वि.यं |
| दिलीप वसंतराव भालेराव | उप.का.अ.म.वि.वि.कं. पांढरकवडा | जि..एम. उजवणे (प्रति.) | विभाग नियंत्रक म.रा.प.म |
| रमेश खरोडे | वि.अ.पंचायत | ए.वाय. पाटील | उप.अभि.पं.प्र.ग्रा.स.यो. |
| विजय पारवानी | स्वियसहा.मु.का.अ. | व्हि.एच. गावंडे | उप का.अ. म.जि.प्रा. |
| भानुदास चरडे | स्वियसहा.उप.मु.का.अ.(सा.) | पी.के.भोंग | स्वि.सहा.मा.अध्यक्ष,जि.प |
| पी.पी. राऊत | स्विय सहा.सभा.शि.व.आ. | एन.पी. कोडगीरवार | स.प्र.अ. सा.प्र.वि. |
| श्रीकांत मडावी | कनि.सहा. सा. प्र. वि. | अरुण नक्षणे | स्वीय सहा. उपाध्यक्ष |
| डी.एम. ठाकरे | आरोग्य सहाय्यक | एम.के.जवादे | क.सहा शि.अ.(प्रा) |

सर्वप्रथम सचिवांनी मा. पदाधिकारी व सन्मा. स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष, जि.प. यवतमाळ तथा (सभापती , स्थायी समिती ) यांचे पुर्वपरवानगीने सभेचे पुढील कामकाज सुरु केले.

## जि.प.स्थायी समिती सभा दिनांक ३१.१.२०१५

**विषय क्र.१ दिनांक ०५.०१.२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास मंजुरी देणे.**

| अ.क्र. | मुद्दा उपस्थित केलेल्या सन्मा.सदस्यांचे नांव व मुद्दा | संबंधीत खातेप्रमुख/प्रतिनिधी यांनी दिलेले अनुपालन | सभेत दिलेले निर्देश | संबंधीत विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत सन २०११-१२ मध्ये जिल्हा नियोजन समिती मधून शाळा दुरूस्तीसाठी प्राप्त निधी अखर्चित राहून परत करण्यात आला असल्याने सबंधितावर कारवाई प्रस्तावित करण्यात यावी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. | **उप मु. का. अ. (सा.)** यांनी संबंधीतांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे, परंतु अदयाप पोहोच प्राप्त झाली नसल्याने पुनश्च रजिस्टर पोस्टाने सबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात येणार आहे. तसेच खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले असता **मा. मु. का. अ.** यांनी उक्त प्रकरणात जे जबाबदार असतील, त्यांचेकडील खुलासा प्राप्त होताच नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश उप मु.का.अ.(सा.) यांना दिले. | उप मु. का. अ. (सा.) जि.प. यवतमाळ |
| २ | **सन्मा.सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी बाभुळगांव तालुक्यातील मौजे चिमणाबागापूर येथील सर्वे नंबर ३० चे संदर्भात म.ग्रा.रो.ह.यो. विभागाकडुन चौकशी करण्यात आली आहे परंतु अहवालामध्ये जे दोषी आहेत अश्यांची यांची नावे टाकण्यात आली नसल्याचे सांगुन नावे समाविष्ट होण्यासाठी आणखी पुराव्याची गरज नाही असे मत व्यक्त करुन मस्टर पाठविणारे, स्वाक्षरी करणारे दोषींची नावे सांगावी. त्याचप्रमाणे दस्तऐवज उपलब्ध करुन दिले नाही त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात यावी असे सुचविले. त्याचप्रमाणे चौकशीमध्ये फक्त प्रशासकीय अधिकारी घेऊन उपयोग नाही असे मत व्यक्त करुन सगळयांना घेऊन चौकशी चांगल्या रितीने करण्याकरीता चौकशीचे वेळी पदाधिकाऱ्यांचा समावेश असावा असे सांगीतले. | **उप मु.का.अ. (म. ग्रा. रो. ह. यो.)** यांनी उक्त प्रकरणातील चौकशी अहवालाची माहिती दिली, व सदर्हु काम एकाच कालावधीत दोन ठिकाणी दाखविण्यात आले असुन दोन्हीही कामावरील दर्शविलेले १ ते २८ मजुर सारखेच असल्याचे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी जबाबदार व्यक्तींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतची नस्ती सादर करुन सबंधितांचा कालावधी व नावासह नस्ती कार्यवाहीस्तव सादर करण्यात यावी. व सबंधिताकडुन वसुली करण्यात यावी. त्याच प्रमाणे चौकशी मध्ये लोक प्रतिनिधी घ्या व चौकशी समितीने १५ दिवसांचे आंत सखोल चौकशी करून अहवाल पुढील सभेत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (म.ग्रा.रो.ह.यो) जि.प. यवतमाळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सादर करण्याचे निर्देश दिले. | |
| ३ | **सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी प. स. यवतमाळ अंतर्गत झालेल्या सन २०१२-१३ मधील कामांची माहिती पुरविण्यात यावी असे सांगीतले. | सन्मा. सदस्य यांनी मागणी केल्यानुसार माहिती सत्वर पुरविण्यात येईल असे **उप मु.का.अ. (म. ग्रा. रो. ह. यो.)** यांनी सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी सदरची माहिती शक्य तितक्या लवकर सन्मा. सदस्यांना पुरविण्याबाबतचे निर्देश **उप मु.का.अ. (म. ग्रा. रो. ह. यो.)** यांना दिले. | उप मु.का.अ. (म. ग्रा. रो. ह. यो.), जि.प. यवतमाळ |
| ४ | **सन्मा. सदस्य श्री. राहूल मा. ठाकरे** यांनी सन २०१२-१३ मध्ये यवतमाळ पं.स.अंतर्गत मौजे यावली, सायखेडा,वाकी, दुधाना, रामनगर, रोहखेड या ठिकाणी नरेगा ची कामे करण्यात आली असुन ४५ मयत व्यक्तीच्या नावाचे पैसे काढण्यात आले आहे. त्यांचे खाते आहेत का ? व इतर माहिती देण्यात यावी. तसेच या कामांची चौकशी करण्यात यावी असे सांगीतले.<br>मा.सभापती * चौकशी अहवाल सादर करा. | **उप मु.का.अ. (म. ग्रा. रो. ह. यो.)** उक्त प्रकरणात ग.वि.अ.प.स. यवतमाळ यांचेकडुन अहवाल मागवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले. | **मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी सदर्हु विषयाचे अनुषंगाने चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबतचे निर्देश **उप मु.का.अ. (म. ग्रा. रो. ह. यो.)** यांना दिले. | उप मु.का.अ. (म. ग्रा. रो. ह. यो.) जि.प. यवतमाळ |
| ५ | **सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी धडक सिंचन विहीरीबाबत विचारणा करुन किती विहीरीचा नरेगा मध्ये समावेश करण्यात आला आहे. याबाबतची माहिती पुरविण्यात यावी असे सांगीतले. तसेच ही योजना सुरु करण्यासाठी शासनाने विविध विभागाना कामे दिली. या एजंसीनी विहीत मुदतीत कामे केली नाही. त्यामुळे योजनेतील कामे प्रलंबित आहेत. शेतक-यांना न्याय देण्यासाठी या एजंसीनी सर्कल निहाय कामे करावी. कामांची माहिती आम्हाला दिल्यास आम्ही मदत करु असे मत व्यक्त करुन याबाबत एजंसीना तसे कळविण्यात यावे असे सागीतले. | **कार्यकारी अभियंता** (सिंचन) यांनी मुदतवाढ मिळालेली आहे व सर्व संबंधितांना कळविण्यात आले असल्याचे सागीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी सन्मा. सदस्यांनी सुचविल्या नुसार पुढील कार्यवाही करण्या बाबतचे निर्देश **का. अ. (सिंचन)** यांना दिले. | का.अ. (सिंचन) जि.प. यवतमाळ |
| | **सन्मा.सदस्य श्री. देवानंद पवार** यांनी मागील सभेत समाज कल्याण विभागामार्फत भजनी साहित्य वाटप केले होते, ते खराब होते म्हणून परत केले, परंतु अद्यापपर्यंत परत केलेले साहीत्य लाभार्थ्यांना अजुनपावेतो परत मिळाले नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. | **समाज कल्याण अधिकारी,** यांनी खराब साहीत्याचा पंचनामा करावा लागेल असे सांगीतले . | **मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी सदर्हु विषय समाज कल्याण समिती मध्ये घेण्यात यावा व साहीत्याचा पंचनामा करण्याबाबत | समाज कल्याण अधिकारी, जि.प. यवतमाळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | निर्णय घेण्यात यावा असे निर्देश **स. क. अ.** यांना दिले. | |
| | **सन्मा.सदस्य श्री. दिवाकर राठोड** यांनी मागील सभेत **पं.प्र.ग्रा.स.यो.** मधुन घेण्यात आलेल्या मौजे दाभा-चिरकुटा येथील रोड चे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने सदहु कामाची क्वालीटी कंट्रोल मार्फत फेर चौकशी करण्यात यावी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. | **कार्यकारी अभियंता (पं.प्र.ग्रा.स.यो.)** यांनी क्वालीटी कंट्रोल यांचेकडील प्राप्त अहवालानुसार सदरचे काम योग्य असल्याचे नमुद केले. त्यावर सन्मा. सदस्य यांनी क्वालीटी कंट्रोल पथकासह मला उपस्थित ठेवुन कामाची चौकशी करण्यात यावी असे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी उक्त कामाची क्वालीटी कंट्रोल मार्फत फेर चौकशी करण्यात येऊन जबाबदार व्यक्तींवर **कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.** | कार्यकारी अभियंता (पं.प्र.ग्रा.स.यो.) जि.प. यवतमाळ |
| ६ | **सन्मा.सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी मौजे नायगांव, ता. बाभुळगांव येथील पंप फसलेला आहे. तरी त्या ठिकाणी टंचाईमध्ये नविन बोअर करावी लागेल.या बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. | **कार्यकारी अभियंता, (पा.पु.)** यांनी मौजे नायगांव, ता. बाभुळगांव येथील पंप फसलेला असल्याने त्या ठिकाणी टंचाईमध्ये नविन बोअर प्रस्तावित केले जाईल असे सांगीतले. | **मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी पुढील कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश **का. अ. (पा. पु.)** यांना दिले. | कार्यकारी अभियंता, (पा.पु.) जि.प. यवतमाळ |
| ७ | **सन्मा.सदस्य श्री. प्रविण वि. देशमुख** यांनी शासनाकडून मौजे कोठा, पाटण, ब्राम्हणवाडा, बोदेगांव व गवारा अशा पांच नविन आरोग्य केंद्रांना मंजुरी मिळाली असल्याने तेथील कामे सुरु करण्याबाबत विभागाकडुन कोणती कार्यवाही करण्यात आली याची विचारणा केली. तसेच बांधकाम विभाग जाणीवपूर्वक या कामाकडे दुर्लक्ष देत आहे, असा माझा आरोप आहे. कारण प्रस्तावाची आजची स्थिती काय हे सुध्दा कार्यकारी अभियंता यांना माहिती नाही, माहिती नसल्याचे सांगुन प्रस्तावाची चौकशी करुन दिरंगाई कोणी केली याची माहिती देण्यात यावी असे सांगीतले. तसेच जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्याकरीता जी पूर्व तयारी करावयास पाहिजे, ती झाली नाही आणि त्यासाठी बांधकाम व आरोग्य विभागाने लक्ष द्यावे व जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्याकरीता तयारी करावी. | **कार्यकारी अभियंता, (बांध.क्र. १)** यांनी उक्त बांधकामाचे अनुषंगाने आरोग्य विभागाने जागेचे सिमांकन करुन दिले नसल्यामुळे प्रलंबित असल्याचे सांगीतले. तसेच प्रस्तावातील आराखडा खाजगी संस्थेकडुन करुन घेऊन अधिक्षक अभियंता यांचे कार्यालयास सादर करण्यात येईल असे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी पुढील कार्यवाही करण्या बाबतचे निर्देश **का.अ.(बांध.क्र.१)** यांना दिले. | कार्यकारी अभियंता, (बांध.क्र. १) जि.प. यवतमाळ |
| ८ | **मा.सभापती (शि.व आ.स) श्री. नरेंद्र के. ठाकरे** यांनी मौजे नवरगाव ता. मारेगाव येथिल १५ सौर पथदिवे बंद असल्याने ते सुरु करण्यात यावे असे | समाज कल्याण अधिकारी यांनी उक्त प्रकरणी माहिती घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी पुढील कार्यवाही सत्वर | समाज कल्याण अधिकारी जि.प. यवतमाळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सांगीतले. | असे सांगीतले. | करण्या बाबतचे निर्देश **समाज कल्याण अधिकारी** यांना दिले. | |
| ९ | **सन्मा.सदस्य श्री. प्रविण वि. देशमुख** यांनी यवतमाळ पंचायत समिती अंतर्गत मुद्रांक शुल्क रकमेमध्ये झालेल्या अनियमितते प्रकरणी ज्या ग्रामसेवकांचा दोष नव्हता अश्या ग्रामसेवकांना दोषी धरण्यात येऊन त्यांना प्रशासनाने निलंबित केलेले आहे. तरी निर्दोष असणा-या ग्रामसेवकांना पुर्ववत कामावर घेण्यात यावे असे सुचविले. | उप मु.का.अ.(पंचायत) यांनी उक्त प्रकरणात उच्च स्तरीय चौकशी समिती नेमण्यात आली असल्याचे सांगीतले. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्दोष असणा-या ग्रामसेवक यांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येत असल्याचे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी पुढील कार्यवाही सत्वर करण्या बाबतचे निर्देश **उप मु. का. अ. (पंचायत)** यांना दिले. | उप मु. का. अ. (पंचायत) जि.प. यवतमाळ |
| १० | **सन्मा.सदस्य सौ. उमा वि. पिदुरकर** यांनी मागील सभेत मौजे सावंगी येथील नळ योजनेचे काम रखडलेले आहे. तसेच कोलगांव प्रा.आ.केंद्राचे काम देखील अपुर्ण अवस्थेत असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. | **का. अ. (पा. पु.)** यांनी मौजे सावंगी येथे बोअरवेल केली, परंतु त्या ठिकाणी पाणी लागलेले नसल्याचे सांगीतले. त्याच प्रमाणे यावर्षीच्या पाणी टंचाई मध्ये उक्त कामाचा समावेश करण्यात आला आहे असे नमुद केले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी पुढील कार्यवाही सत्वर करण्या बाबतचे निर्देश **का अ. (पा. पु.)** यांना दिले. | का. अ. (पा. पु.), जि. प. यवतमाळ |
| ११ | **मा.सभापती (शि.व.आ.स.) श्री. नरेंद्र के. ठाकरे** यांनी मागील सभेत (१) ढाणकी, ता.उमरखेड, (२) मुकूटबन, ता. झरीजामणी, (३) रूंझा, ता. पांढरकवडा, (४) शिरपूर, ता. वणी येथील शव विच्छेदन गृहाचे किरकोळ दुरूस्ती व बांधकाम करण्या बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. | **का. अ. (बांध. १)** यांनी शिरपुरचे काम कंत्राट दाराला देण्यात आले असल्याचे सांगुन मौजे रुझा येथील कामाचे प्राकलन बोलविण्यात आले असल्याचे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी लवकरात लवकर कामे करण्या बाबतचे निर्देश का.अ.बांधकाम क्रमांक १ व २ यांना दिले. | का. अ. (बांध. १ व २), जि. प. यवतमाळ |
| १२ | **सन्मा.सदस्य श्री. प्रविण वि. देशमुख** यांनी मागील सभेत शासन निर्णयानुसार आय. आर. डी.पी. ची पदे भरण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. | उप मु.का.अ.(पंचा.) यांनी शासन निर्णयानुसार आय. आर. डी. पी. ची रिक्त पदे भरणेबाबत पाठपुरावा सुरु असल्याचे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी रिक्त असलेली पदे लवकरात लवकर भरणे बाबतचे निर्देश **उप मु.का.अ.(पंचा.)** यांना दिले. | उप मु.का.अ.(पंचा.), जि. प. यवतमाळ |
| १३ | **मा. सभापती (शि.व आ.स.) श्री. नरेंद्र के. ठाकरे** यांनी मागील सभेत ग्रामपंचायत मारेगाव येथील भ्रष्ट कारभाराची चौकशी होणेबाबत ग.वि.अ. मारेगाव दिनांक ११.०२.२०१४ अन्वये चौकशी अहवाल सादर केलेला आहे. | **उप मु.का.अ.(पंचा.)** यांनी उक्त प्रकरणात ग.वि.अ. प.स. मारेगाव यांना लेखी पत्रान्वये कळविण्यात आले असल्याचे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी उक्त प्रकरणात चौकशी करुन पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश | उप मु. का. अ. (पंचा.) जि. प. यवतमाळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | त्यानुसार कार्यवाही करणे बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. | | **उप मु.का.अ.(पंचा.)** यांना दिले. | |
| १४ | **मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती) जि.प.यवतमाळ** यांनी मागील सभेत पुसद तालुक्यातील शेतक-यांनी पोल व लाईन साठी कोटेशन ची रक्कम भरणा करुनही अद्याप कास्तकरांना विज कनेक्शन देण्यात आले नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. | **कार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.**यवतमाळ चे प्रतिनिधी यांनी कृषि पंपाबाबत कंपनी कडे काम देण्यात आले असुन पोल ची तपासणी सुरु आहे असे सांगुन कामे लवकरच पुर्ण केली जातील असे सांगीतले. | **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष** यांनी ज्या शेतक-यांनी पोल व लाईन साठी कोटेशन ची रक्कम भरणा केलेली आहे त्यांना लवकरात लवकर विज कनेक्शन देणे बाबतची कार्यवाही लवकरात लवकर करणे बाबत कार्यकारी अभियंता, म.रा.वि. वि. कं. यवतमाळ यांना सांगीतले. | **कार्यकारी अभियंता, म .रा. वि. वि. कं. यवतमाळ** |
| | | | | |

**ठराव क्र. १:-** **दिनांक ०५.०१.२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास ही सभा मंजुरी प्रदान करते.**
**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र.२** **शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

१. का.अ.(सिंचन) यांनी सर्वासाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थीतीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत म.शा.जलसंधारण विभाग यांचे कडील शा.नि.क्र. जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर २०१४ चे वाचन केले.

२. का.अ.(सिंचन) यांनी राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या जवाहर/ धडक सिंचन विहीरी महात्मा गांधी राष्टीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वर्ग करण्यात मुदतवाढ देण्याबाबत म.शा. नियोजन विभाग यांचेकडील शा.नि.क्र.विहीर-२०१४/प्र.क्र.६/ रोहयो-५ दिनांक २२ डिसेंबर २०१४ चे वाचन केले.

३. का.अ.(सिंचन) यांनी "भारत जल सप्ताह" समवेत "हमारा जल हमारा" जिवन अभियान राबविण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक तत्वे बाबत म.शा. ग्रा.वि. व जलसंधारण विभागाकडील शा.प. क्र.संकीर्ण /२०१५/प्र.क्र.१४/जल-१ दिनांक १३ जानेवारी २०१५ चे वाचन केले.

**विषय क्र.३** **जिल्हा ग्राम विकास निधी माहे डिसेंबर -२०१४ पर्यंत झालेल्या जमा खर्चास मंजुरात मिळणे बाबत.**

विषयाची माहिती उप मु.का.अ. (पं.) यांनी सभेला दिली. जिल्हा ग्राम विकास निधीच्या जमा खर्चास मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम-१३६ अन्वये स्थायी समितीची सभेची मंजूरात घेणे आवश्यक आहे. माहे **डिसेंबर -२०१४** पर्यंत प्राप्त झालेल्या जमा खर्चाचे विवरण मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे. कृपया प्रस्तावास मंजूरी द्यावी ही विनंती. त्यावर **मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष**, जि. प. यवतमाळ यांनी सभागृहाचे संमतीने खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. २:-** **मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम-१३६ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधी माहे डिसेंबर - २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास ही सभा खालील प्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| | | |
|---|---|---|
| १ | **महिन्यातील सुरवातीची शिल्लक** | **१०,१७,३८,६०९.४१** |
| २ | **महिन्यातील प्राप्त रक्कम रुपये** | **१२,०८०.००** |
| ३ | **एकुण जमा रक्कम रुपये** | **१०,१७,५०,६८९.००** |
| ४ | **महिन्यातील झालेला खर्च रक्कम रुपये** | **४७,३९,००६.००** |
| ५ | **महिन्यातील अखेर शिल्लक रक्कम रुपये** | **९,७०,११,६८३.४१** |
| ६ | **अरोखीत धनादेश** | **१०००.००** |
| | **एकुण** | **९,७०,१२,६८३.००** |

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही, ठराव सर्वानूमते मंजुर करण्यात आला.**

**मा. अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती ) यांचे पुर्वपरवानगीने आयत्या वेळी येणारे विषय.**

**विषय क्र.४ :-जिल्हा ग्राम विकास निधीतील गुंतवणूक केलेल्या रक्कमेची मुदत संपत असल्यामुळे ती रक्कम (मुद्दल अधिक व्याजासह) पुन्हा २ वर्षाकरीता सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा दर्डानगर यवतमाळ येथे गुंतवणूक करण्याबाबत.**

विषयाची माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी सभेत दिली. दिनांक २/१/२०१५ रोजी जिल्हा ग्राम विकास निधीचे खात्यांत खालीलप्रमाणे रक्कम शिल्लक आहे.

| अ.क्र. | **तपशिल** | शिल्लक रक्कम |
|---|---|---|
| १ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेयवतमाळ खाते क्र.१ मध्ये जमा रक्कम रुपये | १२,२३०.४१ |
| २ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया दर्डा नगर यवतमाळ खाते क्र.३४११६०८६८१ मध्ये जमा रक्कम | १२,०००.०० |
| ३ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ३ वर्षाकरीता पुनर्गुंतवणूक करण्यांत आलेली आहे.पावती क्र. ०२४१५७ दि.१५/११/०१२ ते १५/११/२०१५ व्याज दर ८.५०% | ४,८९,०१,६३७.०० |
| ४ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २ वर्षाकरीता मुदत ठेवीत गुंतवणूक करण्यांत आलेली आहे. पावती क्र. २४७०२६ दि.२६/६/०१३ ते २२/६/२०१५ व्याज दर ९.००% | १,७३,९८,८३७.०० |
| ५ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २ वर्षाकरीता मुदत ठेवीत गुंतवणूक करण्यांत आलेली आहे. पावती क्र. ००७७८ दि.६/५/०१३ ते ५/५/२०१५ व्याज दर १०.००% | १,७७,०००००.०० |
| ६ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत तेरा महिण्याकरीता मुदत ठेवीत गुंतवणूक करण्यांत आलेली आहे. पावती क्र. १५०१०३ दि.७/१/०१४ ते ७/१/ २०१६ व्याज दर ९.००% | ५९,४९,५३५.०० |
| ७ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत दोन वर्षाकरीता मुदत ठेवीत गुंतवणूक करण्यांत आलेली आहे. पावती क्र. ००००२१० दि.१३/२/०१३ ते १३/२/२०१५ व्याज दर १०.००% | ७०,००,०००.०० |
| ८ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया दर्डा नगर यवतमाळ येथे दोन वर्षाकरीता मुदत ठेवीत गुंतवणूक करण्यांत आलेली आहे. पावती क्र.०७३५२९ दि.३/१२/२०१४ ते ३/१२/२०१६ व्याज दर ८.७५% | ४७,००,०००.०० |
| | **एकुण** | **१०,१६,७४,२३९.४१** |

वरील प्रमाणे दिनांक २/१/२०१५ रोजी १०,१६,७४,२३९.४१ एकुण रुपये निधीत शिल्लक असून त्यापैकी बचत खाते क्र. १ मध्ये १२,२३०.४१/-रु.जमा आहे.तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया यवतमाळ शाखेत रु.१२,०००/- शिल्लक आहे. अनुक्रमांक ७ चे प्रमाणपत्र क्र. ००००२१० ची मुदत दिनांक १३/२/२०१५ रोजी संपत आहे.त्यापोटी मुदतीनंतर अंदाजे मुद्दल अधिक व्याजासह रु.८३,९९,९९९/-रक्कम मिळणार आहे. पंचायत समितीस्तरावरुन ग्रामपंचायतीची तुर्त कर्जाची मागणी नसल्यामुळे मुद्दल अधिक व्याजासह मिळणारी एकुण रक्कम रुपये **८३,९९,९९९/-रु.** (अक्षरी त्र्याअंशी लाख नव्यानव हजार नऊशे नव्यानव फक्त) सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा दर्डानगर यवतमाळ येथे २ वर्षाकरीता मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक करण्याचे प्रस्तावित असून सदर विषयाला तुर्त स्थायी समितीचे सभेत मंजूरी घेऊन त्यांस पुढील होणा-या जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजूरी करीता सादर करण्यांत येईल .तरी सदरहू विषय स्थायी समितीचे सभेत मंजूरीस्तव सविनय सादर. **सदर्हू विषयावर चर्चा होऊन मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जिल्हा परिषद यवतमाळ** यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्रं.३:- पंचायत समितीस्तरावरुन ग्रामपंचायतीची तुर्त कर्जाची मागणी नसल्यामुळे मुद्दल अधिक व्याजासह मिळणारी एकुण रक्कम रुपये ८३,९९,९९९/-रु. (अक्षरी त्र्याअंशी लाख नव्यानव हजार नऊशे नव्यानव फक्त)जिल्हा ग्राम विकास निधीतील गुंतवणूक केलेल्या रक्कमेची मुदत संपत असल्यामुळे ती रक्कम (मुद्दल अधिक व्याजासह) पुन्हा दोन वर्षाकरीता सन्मा. सदस्य यांनी सुचविल्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थीक स्थीती चांगली असल्यामुळे, या पुर्वी ठेवी ज्या ज्या बँकेमध्ये आहे, त्या ठेवी तशाच त्याच बँकेमध्ये ठेवण्या बाबत ही सभा शिफारस करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत उप मु.का.अ.(पंचा.) यांना ही सभा निर्देश देते.**

**विषय क्र.५:- शाळा इमारत (वर्गखोल्या) निर्लेखित करणेबाबत. पंचायत समिती आर्णी मधील महाळुगी येथील शाळेच्या ०५ वर्गखोल्या निर्लेखनाबाबत**

विषयाची माहिती शि.अ.(प्राथ.) यांनी सभेत दिली. पंचायत समिती आर्णी अंतर्गत खालील शाळा इमारत (वर्ग खोल्या) निर्लेखित करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.सदर प्रस्तावाला उपअभियंता जि.प. बांधकाम उपविभाग, आर्णी यांनी इमारत (वर्गखोल्या) निर्लेखित करणेकरिता लागणाऱ्या तरतुदीला मान्यता दिली आहे. तेव्हा सदर इमारत (वर्गखोल्या) निर्लेखित करणेकरिता प्राकलणास मंजुरीस्तव स्थायी समितीचे सभेसमोर ठेवण्यात येत आहे. कृपया खालील प्रस्तावास मंजुरात प्रदान करण्यात यावी ही विनंती. **सदहू विषयावर चर्चा होऊन मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जिल्हा परिषद यवतमाळ** यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. ४:- पंचायत समिती आर्णी मधील महाळुगी येथील शाळेच्या ०५ वर्गखोल्या निर्लेखनाबाबत च्या प्रस्तावाचे प्राकलनास ही सभा खालील प्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| अ.क्र. | शाळेच नाव | पंचायत समिती | निर्लेखित करावयाच्या वर्गखोल्या | प्राकलन रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जि.प. प्राथ.शाळा महाळुगी | आर्णी | ०५ | १९४२०/- |

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही, ठराव सर्वानूमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र. ६:- मौजे किन्हाळा पाझर तलावाचे बांधकाम करणे ता.कळंब जि.यवतमाळ निविदा मंजुरी बाबत रू.४०,८६,५१३/-**

विषयाची माहिती का.अ.(सिंचन) यांन सभेत दिली. मौजे किन्हाळा पाझर तलावाचे बांधकाम करणे ता.कळंब जि.यवतमाळ येथिल कामाबाबतची निविदा दि.११/९/२०१४ रोजी on Line निविदा मागविण्यात आल्याअसून on Line निविदा उघडल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| SlNo | Bidder Name | Amount as per Sechudle घB'ड | Bid Rank | Quoted Percentage | Amount as per Quoted rate |
|---|---|---|---|---|---|
| १ | Shri N. B. Dhume | ४०,८६,५१३/ | L-१ | - ९.९९ | ३६,७८,२७०/- |
| २ | M/s S P Jirapure | ४०,८६,५१३/ | L-२ | - ९.५० | ३६,९८,२९४/- |
| ३ | Shri. K. D. Sharma | ४०,८६,५१३/- | L-३ | - ९.०१ | ३७,१८,३१८/- |

वरील कंत्राटदारा पैकी **श्री.एन.बी. धुमे कंत्राटदार रा. यवतमाळ** यांची निविदा सर्वात कमी दराची (-९.९९%)अक्षरी **नऊ पूर्णांक नव्यान्नव टक्के कमी दराने** भरली आहे. सदर दर शेडयुल दरापेक्षा कमी असून कमी दराने निविदेची प्रत्यक्ष किंमत रु.**३६,७८,२७०/-** (अक्षरी रु.छत्तीस लाख अठठयाहात्तर हजार दोनशे सत्तर फक्त)आहे. करिता **कमी दराची** निविदा स्विकृतीस्तव सादर करण्यांत येत आहे.

सदर काम सन **२०१२.२०१३** चे प्रचलीत दरसुची नुसार असून कामा वरिल खर्च **२७०२-४७७२ ल.पा.आदीवासी** या शिर्षकातील प्राप्त अनुदानातुन करावयाचा आहे.

सदर मुळ निविदा **रूपये ४०,८६,५१३/-** किंमतीची असल्यामुळे निविदा स्विकृतीचे अधिकार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ तथा लेखा संहिता १३९ (३) मधील तरतुदी नुसार तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक/झेडपिए/२०१२/प्रक्र ६८०/वित्त९ दिनांक १९ मार्च,२०१२ नुसार निविदा मंजुरीचे अधिकार **जिल्हा परिषद स्थायी समितीचे सभेस** असल्याने प्रस्ताव सभेत मंजूरीस्तव ठेवण्यांत येत आहे. . **सदर्हू विषयावर चर्चा होऊन मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जिल्हा परिषद यवतमाळ** यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. ५:- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ तथा लेखा संहिता १३९ (३) मधील तरतुदी नुसार तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक/झेडपिए/२०१२/प्रक्र ६८०/वित्त९ दिनांक १९ मार्च,२०१२ नुसार कंत्राटदार श्री.एन.बी. धुमे कंत्राटदार रा. यवतमाळ यांची शेडयुल दरापेक्षा सर्वात कमी दराची (-९.९९%) अक्षरी नऊ पूर्णांक नव्यान्नव टक्के कमी दराने निविदेची प्रत्यक्ष किंमत रु.३६,७८,२७०/- (अक्षरी रु.छत्तीस लाख अठठयाहात्तर हजार दोनशे सत्तर फक्त मौजे किन्हाळा पाझर तलावाचे बांधकाम करणे ता. कळंब जि. यवतमाळ निविदा रू.४०,८६,५१३/- चे मंजुरीस तथा सदर काम सन २०१२-२०१३ चे प्रचलीत दरसुची नुसार असून कामा वरिल खर्च २७०२-४७७२ ल. पा. आदीवासी_ या शिर्षकातील प्राप्त अनुदानातुन भागविण्यास ही सभा मान्यता प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही, ठराव सर्वानूमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.७:- कार्यकारी अभियंता बांधकाम क्र.१ यांचेकडुन प्राप्त झालेल्या बांधकामाचे प्राकलनास सुधारीत प्रशासकीय मान्यतेस शिफारशीस्तव मंजुरात मिळणेबाबत.**

विषयाची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सभेत दिली. कार्यकारी अभियंता बांधकाम क्र.१ यांचे पत्र क्र.यजिप/बांध.१/ता.शा.-२ यांचे जावक क्र. ३८५४ दिनांक १८.१२.१४ अन्वये प्रा.आ.उपकेंन्द्र गोंडबुरांडा ता. मारेगाव येथील उपकेंद्र बांधकामाचे प्राकलन रु.४७,६६,०००/- (बिगर आदीवासी क्षेत्र) चे सुधारीत प्रशासकीय मान्यतेस शिफारशी करिता स्थायी समिती सक्षम असल्यामुळे सदर विषयास शिफारशीस्तव दिनांक २३.१२.२०१४ चे आरोग्य समिती सभेतील ठराव क्र.१४ अन्वये मंजुरात प्रदान केलेली आहे.

तेव्हा सदर विषयास स्थायी समितीची मंजुरात आवश्यक असल्याने प्रा.आ.उपकेंन्द्र गोंडबुरांडा ता. मारेगाव येथील उपकेंद्र बांधकामाचे प्राकलन रु.४७,६६,०००/- (बिगर आदीवासी क्षेत्र) चे सुधारीत प्रशासकीय मान्यतेस सभेसमोर सादर करण्यात येत आहे. कृपया मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती. **सदर्हू विषयावर चर्चा होऊन मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जिल्हा परिषद यवतमाळ** यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.६:- जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार कार्यकारी अभियंता बांधकाम क्र.१ यांचेकडुन प्राप्त झालेल्या प्रा.आ.उपकेंन्द्र गोंडबुरांडा ता. मारेगाव येथील उपकेंद्र बांधकामाचे प्राकलन रु.४७,६६,०००/-(बिगर आदीवासी क्षेत्र)चे सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास ही सभा मंजुरात प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही, ठराव सर्वानूमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र ८:- जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा परिषद प्राथ. शाळा, अंतर्गत विशेष दुरूस्तीकरिता प्राप्त अनुदान खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

विषयाची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सभेत दिली. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जि.प.प्राथ. शाळांच्या विशेष दुरूस्तीकरिता . जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक जिवायो/का-१ /निधी/वि जिप/२२४/२०१४ दि.०८/०८/२०१४ अन्वये रू. ४८,००,०००/- (अठ्ठेचाळीस लाख फक्त) अनुदान प्राप्त झाले आहे. सदर अनुदान सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात शाळा दुरूस्तीकरिता खर्च करायचे आहे. सदर अनुदान खर्च करण्याकरिता शाळेच्या देखभाल दुरूस्तीची यादी यासोबत सादर करण्यात येत आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए/२०१२/प्र.क्र. ६८०/वित्त-९/ मंत्रालय, मुंबई दि. १९ मार्च २०१२ चे शासन निर्णयानुसार खर्चास मान्यता देण्याचे अधिकार जि.प. स्थायी समिती सभेला रू. २५,००,०००/- ते रूपये ५०,००,०००/- पर्यंत असल्याने दिनांक ३१/०१/२०१५ रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद स्थायी समिती सभेत रू. ४८,००,०००/- (अठ्ठेचाळीस लाख फक्त) प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी व खर्चास मंजुरीसाठी प्रस्ताव जिल्हा परिषद स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यात येत आहे. **सदहू विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जिल्हा परिषद यवतमाळ** यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

ठराव क्र.७:- **शासन निर्णय क्रमांक झेडपीए/२०१२/प्र.क्र. ६८०/वित्त-९/ मंत्रालय, मुंबई दि. १९ मार्च २०१२ चे निर्णयानुसार जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा परिषद प्राथ. शाळा, अंतर्गत विशेष दुरूस्तीकरिता प्राप्त अनुदान सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रू. ४८,००,०००/-(अठ्ठेचाळीस लाख फक्त) खर्चाचे खालील प्रस्तावास ही सभा प्रशासकीय मान्यता प्रदान करते.**

**सहपत्र- शाळा दुरुस्ती यादी.**

| अ. क्र. | योजनेचे नाव | पंचायत समिती | योजनेचे /कामाचे नाव (शाळा दुरूस्ती बांधकाम) | शाळा दुरूस्तीकरिता लागणारी तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | प्राथमिक शाळा विशेष दुरूस्ती | कळंब | जि.प.प्राथ. शाळा, धोत्रा | ०.६० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, नांझा | ०.५० |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा, कळंब (माथा) | १.०० |
| | | घाटंजी | एकुण | २.१० |
| १ | | | जि.प.प्राथ. शाळा, दत्तापुर | २.२५ |
| | | | एकुण | २.२५ |
| | | | | |
| १ | | महागाव | जि.प.प्राथ. शाळा, घोनसरा | १.०० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, हिवरा | १.०० |
| | | | एकुण | २.०० |
| १ | | उमरखेड | जि.प.प्राथ. शाळा, बेलखेड | १.५० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, डोंगरगाव | १.०० |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा, मुलींची विडूळ | २.०० |
| ४ | | | जि.प.प्राथ. शाळा, जूनोना | ०.५० |
| ५ | | | जि.प.प्राथ. शाळा, दराटी | ०.५० |
| ६ | | | जि.प.प्राथ. शाळा,परोटी | १.०० |
| ७ | | | जि.प.प्राथ. शाळा,मोहदरी | १.०० |
| | | | एकुण | ७.५० |
| १ | | वणी | जि.प.प्राथ. शाळा, वेळाबाई | १.०० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, पेटूर | १.०० |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा,नायगाव (खुर्द) | १.०० |
| ४ | | | जि.प.प्राथ. शाळा, सोमनाळा | १.०० |
| ५ | | | जि.प.प्राथ. शाळा, दहेगाव घोन्सा | ०.५० |
| ६ | | | जि.प.प्राथ. शाळा, शिवणी | १.०० |
| | | | एकुण | ५.५० |
| १ | | नेर | जि.प.प्राथ. शाळा, चिचगांव | १.०० |
| | | | एकुण | १.०० |
| १ | | आर्णी | जि.प.प्राथ. शाळा,अंबोडा | ०.५० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा,चिखली (ई) | ०.५० |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा,रुद्रापुर | ०.५० |
| | | | एकुण | १.५० |
| १ | | | जि.प.प्राथ. शाळा, काटखेडा (बु.) | १.०० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, शेलु फाटा | ०.५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | | पुसद | जि.प. प्राथ.शाळा, कृष्णनगर | ०.५० |
| ४ | | | जि.प.प्राथ.शाळा, हर्षी | १.०० |
| ५ | | | जि.प.प्राथ.शाळा,माजंरजवळा | ०.५० |
| ६ | | | जि.प.प्राथ.शाळा,रोहडा | ०.५० |
| ७ | | | जि.प.प्राथ.शाळा,अडगाव | ०.५० |
| ८ | | | जि.प.प्राथ.शाळा,हिवळणी | ०.५० |
| ९ | | | जि.प.प्राथ.शाळा,मारवाडी(बु) | ०.५० |
| १० | | | जि.प.प्राथ.शाळा,वसंतवाडी | ०.५० |
| | | | **एकुण** | **६.००** |
| १ | | यवतमाळ | जि.प.प्राथ. शाळा, रातचांदणा | १.०० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, लोहारा | ३.०० |
| | | | एकुण | ४.०० |
| १ | | दारव्हा | जि.प.प्राथ. शाळा,मानकोपरा | ०.७५ |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा,रामगांव रामेश्वर | ०.७५ |
| | | | एकुण | १.५० |
| १ | | दिग्रस | जि.प.प्राथ. शाळा, बोरी | ०.५० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, हरसूल | ०.५० |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा,रामगाव डोर्लि | १.०० |
| | | | एकुण | २.०० |
| १ | | मारेगाव | जि.प.प्राथ. शाळा, कोसारा | ०.५० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा,आवळगाव | ०.५० |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा,खैरगाव (भे) | ०.६० |
| ४ | | | जि.प.प्राथ. शाळा,हिवरी | ०.४० |
| | | | एकुण | २.०० |
| १ | | बाभुळगांव | जि.प.प्राथ. शाळा, नांदे सावंगी | ०.५० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, नायगाव | ०.७५ |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा, दाभा | १.०० |
| | | | एकुण | २.२५ |
| १ | | पांढरकवडा | जि.प.प्राथ. शाळा,मोहदा | १.०० |
| २ | | | जि.प. प्राथ.शाळा अकोली बु. | १.०० |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा बोथ | १.०० |
| | | | एकुण | ३.०० |
| १ | | झरी | जि.प.प्राथ. शाळा,माथार्जुन | १.०० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा, कुंडी | १.०० |
| | | | एकुण | २.०० |
| | | राळेगाव | | |
| १ | | | जि.प.प्राथ. शाळा,खैरी | १.०० |
| २ | | | जि.प.प्राथ. शाळा रावेरी | १.४० |
| ३ | | | जि.प.प्राथ. शाळा वाठोडा | १.०० |
| | | | एकुण | ३.४० |
| | | | एकुण रक्कम- | ४८.०० |

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही, ठराव सर्वानूमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.९ : ग्रामपंचायत बिटरगांव (बु) चे विभाजन करून रतननाईक नगर येथे नवीन ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत**

विषयाची माहिती उप मु.का.अ.(पंचा.) यांनी सभेत दिली. पंचायत समिती उमरखेड अंतर्गत ग्रा.पं. बिटरगांव (बु) चे विभाजन करून रतननाईक नगर येथे नवीन ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती उमरखेड यांचे क्रमांक/पंसउ/पंचा/वशि/१४८४/२०१४, दिनांक १७.११.२०१४ अन्वये प्रस्ताव या कार्यालयांस प्राप्त झालेला आहे. तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

शासन निर्णय क्रमांक/व्हीपीएम/२६०३/प्र.क्र.१५४४/पंरा-४ (२२)दिनांक: १२ फेब्रुवारी, २०१४ अन्वये **ज्या महसुली गावी, स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची असेल, त्या गावाची लोकसंख्या कमीतकमी २००० असणे आवश्यक आहे. केवळ अपवादात्मक प्रकरणांत उदा.आदीवासी व तांडा या भागांसाठी किंवा दोन गावांत जर तीन किमी पेक्षा जास्त अंतर असेल, तर त्या भागाकरीता किमान लोकसंख्या १००० असणे आवश्यक आहे.**

गटविकास अधिकारी,पंचायत समिती उमरखेड यांचे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये ग्रा.पं.बिटरगांव (बु) चे विभाजन करून रतननाईक नगर येथे नवीन ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत प्रस्ताव प्राप्त असून रतननाईक नगर (तांडा) गांव हे तांडा वस्ती असल्याचे म्हटले आहे. शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा प्रस्ताव जिल्हा परिषदेचे स्थायी समितीसमोर ठेवून त्यांचे काही अभिप्राय असल्यास ते नोंदवून मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांचे मार्फत शासनास सादर करावयाचा आहे.

तरी ग्रामपंचायत बिटरगांव (बु) चे विभाजन करून रतननाईक नगर (तांडा) येथे नवीन ग्रामपंचायत स्थापन करणे बाबत प्रस्ताव आज दिनांक ३१.०१.२०१५ रोजी होणा-या जिल्हा परिषद यवतमाळचे स्थायी समिती सभेसमोर मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने सादर करण्यांत येत आहे. प्रस्ताव स्थायी समितीचे मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रं.८ : शासन निर्णय क्रमांक /व्हीपीएम/२६०३/प्र.क्र.१५४४/ पंरा-४ (२२) दिनांक १२ फेब्रुवारी २००४ अन्वये यवतमाळ जिल्हयातील पंचायत समिती, उमरखेड ग्रामपंचायत बिटरगांव (बु) चे विभाजन करून रतननाईक नगर येथे नविन ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतच्या खालील प्रस्तावास ही सभा शिफारस करते.**

| सध्याच्या ग्रामपंचायतचे नांव | | | प्रस्तावित ग्रामपंचायतचे नांव | | | उत्पन्न | दरडोई उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सध्याची ग्रा.पं.चे नांव | समाविष्ट महसुली गांवे | लोक संख्या | प्रस्तावित ग्रामपंचायतचे नांव | समाविष्ट महसुली गांवे | लोक संख्या | | |
| बिटरगांव (बु) | बिटरगांव (बु) | 4671 | रतननाईक नगर (तांडा) | रतननाईक नगर (तांडा) | 490 | 84320 | 80/- |
| | रतननाईक नगर (तांडा) | 490 | | भोजनगर (तांडा) | 564 | | |
| | भोजनगर (तांडा) | 564 | | | | | |

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही, ठराव सर्वानूमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.१०:- जिल्हा परिषद. यवतमाळ अंतर्गत रुपये ५० हजार रुपयावरील आठवडी / गुरांचे बाजार हर्रासाचे सन २०१५-२०१६ करिता धोरण ठरविण्याबाबत.**

विषयाची माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी सभेत दिली. सन २०१५-२०१६ करीता रुपये ५००००/- हजारावरील जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत ग्रामपंचायतीचे बाजार जिल्हा परिषदेची मान्यता घेवून अंतिम करण्यात येतात. ही प्रक्रिया माहे फेब्रू / मार्च अखेर पार पडते. याबाबत दिनांक ०४/०१/२०१४ रोजी झालेल्या जि.प.सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक ७ नुसार धोरण ठरविण्यात आले ते खालील प्रमाणे.